**वृत्तपत्र :**लोकसत्ता
**दिनांक :**१०/०१/२००६

## प्रदूषण नियंत्रणात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर

देशातील सर्व राज्यांत कार्यरत असलेल्या प्रदूषण नियंत्रणाच्या कामात सर्वोत्कृष्ट कामगिरी केल्याबाबत महाराष्ट्राला केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पहिला क्रमांक देऊन गौरविले आहे, तर यात गुजरात दुस-या क्रमांकावर आहे. मुंबईत ५ आणि ६ जानेवारी या दोन दिवसांत राज्य प्रदूषण मंडळाच्या शिखर संमेलनात नुकताच महाराष्ट्राला हा सन्मान देऊन गौरविण्यात आले. यावेळी घनकचरा व्यवस्थापनाबाबत कार्यरत असलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या समितीचे अध्यक्ष डॉ.जी. त्यागराजन म्हणाले की, प्रदूषण नियंत्रणाच्या कामी महाराष्ट्राचे योगदान आणि कार्य महत्वपूर्ण असून अन्य राज्यांनी महाराष्ट्राचा आदर्श ठेवण्याचा प्रयत्न करावा. या परिषदेदरम्यान प्रदूषण मंडळाच्या सदस्य सचिव व अध्यक्षांचा बैटकीकरिता केंद्रीय पर्यावरणमंत्री ए.राजा व महाराष्ट्राचे गणेश नाईक उपस्थित होते.